

# भगतसिंह जनअधिकार यात्रा

दुसरा टप्पा

10 डिसेंबर 2023 – 3 मार्च 2024

## सामील व्हा!

**भगतसिंहांची ऐका बात !**
**नव्या क्रांतीची करा सुरुवात!**

**शिक्षण व रोजगार, आपला जन्मसिद्ध अधिकार!**

**हिंदू-मुस्लिम-शीख-इसाई, सर्वांना मारतेय महागाई!**

**जाती-धर्मांचे झगडे सोडा, खऱ्या लढ्याशी नाते जोडा!**

साथींनो,

**‘भगतसिंह जनअधिकार यात्रे’च्या दुसऱ्या टप्प्यात** आम्ही तुमच्यामध्ये आलो आहोत. सामान्य जनतेच्या मूलभूत हक्कांसाठीचा लढा पुढे नेणे आणि त्यासाठी जनतेला जागृत, एकत्रित आणि संघटित करणे हे या यात्रेचे उद्दिष्ट आहे. **ही यात्रा 10 डिसेंबर 2023 रोजी कर्नाटकातील बेंगळुरू येथून सुरू होऊन आणि देशातील 13 राज्ये आणि 80हून अधिक जिल्ह्यांतून 8500 किलोमीटरचे अंतर पार करीत 3 मार्च 2024 रोजी दिल्लीला पोहोचेल.** आपण सर्व यात्रेत सहभागी व्हावे, हे आवाहन !

देशातील सामान्य कष्टकरी जनतेच्या जीवनाची परिस्थिती लपलेली नाही! महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचाराने लोकांचे जीवन नरकासमान झाले आहे. लोक मुलांना पौष्टिक आहार, दर्जेदार आरोग्य किंवा दर्जेदार शिक्षणही देऊ शकत नाहीत. या खऱ्या प्रश्नांचा विचार न करता आपण आपसात लढावे म्हणून राज्यकर्ते मंदिर-मशीद, आरक्षण अशा भूलथापांमध्ये आणि अंधराष्ट्रवादी उन्मादामध्ये आपल्याला अडकवत आहेत.

इतर लुटारू राज्यकर्त्यांप्रमाणेच आपल्या देशातील राज्यकर्तेसुद्धा आपल्याला भासवत आहेत की आपली गरिबी, दुःख, बेरोजगारी, बेघरपणा आणि सामाजिक-आर्थिक असुरक्षिततेला आपणच जबाबदार आहोत, आपणच नालायक आहोत कारण आपण 18 तास काम करायला तयार नाही, कारण आपण खूप मुले जन्माला घालतो! आंतरराष्ट्रीय मंदीमुळे भारतात बेरोजगारी, महागाई वाढत असल्याचे ते सांगतात! असे भासवतात की बेरोजगारी, महागाईमध्ये सरकारचा दोष नाही, जणू त्या भूकंप वा त्सुनामीसारख्या नैसर्गिक संकट आहेत, ज्यावर कोणाचेही नियंत्रण नाही! पण सत्ताधारी वर्गाकडून केल्या जात असलेल्या या प्रचारात काही तथ्य आहे का? अजिबात नाही! **वाढती बेरोजगारी, महागाई आणि सामाजिक व आर्थिक असुरक्षितता या गोष्टी नशिबाचे भोग किंवा नियती म्हणून स्वीकारण्यासाठी हा अपप्रचार केला जात आहे. सर्व लुटारू राज्यकर्त्यांना नेहमी हेच हवे असते.**

सत्य हे आहे की, विशेषत: गेल्या 10 वर्षात भारतातील कष्टकरी लोकांच्या राहणीमानात आणि कामाच्या परिस्थितीत अभूतपूर्व घसरण झाली आहे आणि ह्याचे कारण सध्याच्या सरकारची लोकविरोधी धोरणे आहेत. पूर्वीसुद्धा सर्व सरकारे देशाचे मालक, ठेकेदार, जमीन मालक, दलाल ह्यांचेच हित साधत असत. **परंतु 2014 पासून विद्यमान सरकारने भांडवलदारांची खुलेआम सेवा करून सर्वसामान्यांची लूट करण्याचे सर्व रेकॉर्ड उद्ध्वस्त केले आहेत. हे सत्य समजून घेणे आज खूप गरजेचे आहे.**

## रेकॉर्डतोड महागाईचे कारण काय?

महागाई का वाढत आहे? महागाई वाढण्यामागील जे संरचनात्मक कारण आहे, ज्यामुळे विविध वस्तू आणि सेवांच्या किमती वेळोवेळी वाढत आहे, ते म्हणजे **एक अशी व्यवस्था आहे ज्यामध्ये संपूर्ण उत्पादन, विनिमय आणि वितरण जनतेच्या गरजांना पूर्ण करण्यासाठी नियोजनबद्धपणे होत नाही, तर मूठभर श्रीमंत लोकांची तिजोरी भरण्यासाठी आणि अराजक पद्धतीने होते**. अशा अराजक व्यवस्थेत वेगवेगळ्या वस्तूंच्या किमती वेगवेगळ्या वेळी वाढतात आणि कमी होतात. पण आज आपल्या देशातील महागाईने सर्व विक्रम मोडीत काढण्यामागे एक तात्कालिक ठोस कारण आहे: **एकीकडे मोदी सरकार श्रीमंतांना करांमध्ये विविध सवलती आणि सूट देऊन त्यांचे हित साधत आहे आणि दुसरीकडे सामान्य माणसावर कराचा बोजा वाढवला जात आहे.** गेल्या 10 वर्षात मोदी सरकारने मोठमोठे मालक, कंपन्या इत्यादींवरील कर कमी केले आहेत, त्यांना जमीन, वीज, पाणी, अगदी कर्जातही मोठ्या सवलती दिल्या गेल्या आहेत आणि सामान्य जनतेवरील अप्रत्यक्ष कराचा बोजा प्रचंड वाढवला आहे.

2017च्या पूर्वी, करांमधून मिळणाऱ्या एकूण सरकारी **महसुलाच्या 32 टक्के रक्कम** श्रीमंतांकडून गोळा केल्या जाणाऱ्या **कॉर्पोरेट करातून** येत होती. **2023 पर्यंत ती 24 टक्क्यांहून कमी** झाली आहे, आणि श्रीमंत लोकांच्या नफ्यात या दरम्यान लक्षणीय वाढ झाली आहे. दुसरीकडे

**जीएसटी** आणि इतर शुल्कांच्या माध्यमातून सर्वसामान्यांवर कराचा बोजा वाढवला गेला आहे. ही रक्कम एकूण कर महसुलाच्या निम्म्याहूनही अधिक आहे! **पेट्रोलियम पदार्थांच्या किमतींपैकी सुमारे 60 टक्के केवळ कर** आहेत. 2021-22 मध्ये केंद्र सरकारने **3.73 लाख कोटी रुपये आणि सर्व राज्य सरकारांनी मिळून 2.02 लाख कोटी** रुपये पेट्रोल आणि डिझेलवरील कराच्या माध्यमातून जमा केले. जेव्हा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात एवढी मोठी वाढ होते तेव्हा त्याचा परिणाम प्रत्येक वस्तूच्या किमतीवर होत असतो. त्याचप्रमाणे केंद्र सरकारने गेल्या 10 वर्षांत **स्वयंपाकाच्या गॅसच्या किमतीसुद्धा दुपटीहून अधिकने वाढवल्या** ज्याचा भयंकर परिणाम सर्वसामान्यांच्या जगण्यावर झाला आहे.

**पेट्रोलियम उत्पादनांवर**
**60%**
**टॅक्स !**

**मोदी सरकार जनतेवर कराचा बोजा वाढवत आहे कारण त्यांना बड्या धनदांडग्यांना देण्यात आलेल्या करसवलतीची भरपाई करायची आहे.** भांडवलदारांना दिल्या जाणाऱ्या सवलतींमुळे सरकारी उत्पन्नात घट होत आहे. राजकारणी, मंत्री, खासदार, आमदार, बडे नोकरशहा यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांमध्ये कुठलीही कमतरता राहू नये, यासाठी सामान्य जनतेवर कराचा बोजा सातत्याने वाढवला जात आहे. गेल्या 10 वर्षात आपल्या देशात महागाईत झालेल्या अभूतपूर्व वाढीचे हेच खरे ठोस कारण आहे. **ही नैसर्गिक आपत्ती नाही. सध्याच्या सरकारची धोरणेच यासाठी जबाबदार आहेत, ज्यांचे उद्दिष्ट आहे: भांडवलदारांची सेवा करा आणि जनतेला लुटून बरबाद करा.**

## बेरोजगारी एवढी का वाढत आहे?

आपल्याला नेहमी सांगितले जाते की बेरोजगारीचे कारण वाढती लोकसंख्या हे आहे. हे साफ खोटे आहे. माणूस फक्त पोट घेऊन जन्माला येत नाही तर त्याला हात आणि पाय सुद्धा आहेत. त्याचे श्रम निसर्गात बदल करून समृद्धी निर्माण करू शकतात. अतिशय साधीशी गोष्ट आहे: **अधिक लोक म्हणजे अधिक गरजा, अधिक गरजा म्हणजे अधिक उत्पादनाची गरज, अधिक उत्पादनाची गरज म्हणजे अधिक नोकऱ्या.** गेल्या 10 वर्षांत आपल्या देशातील **अन्न उत्पादनात 18.30 टक्क्यांनी वाढ झाली आहे. याच दरम्यान लोकसंख्या 10.7 टक्क्यांनी वाढली.** मग देशात उपासमार आणि कुपोषण का वाढले? जर लोकसंख्या हे या समस्यांचे कारण असेल तर नक्कीच उपासमार आणि कुपोषण कमी व्हायला हवे होते. यावरून स्पष्ट आहे: लोकसंख्येचा मुद्दा केवळ एक निमित्त आहे, प्रत्यक्षात सामान्य जनताच निशाण्यावर आहे. नक्कीच, सुशिक्षित समाजात लोक जास्त मुले जन्माला घालत नाहीत आणि याबाबतचा निर्णय घेणे हा महिलांचा लोकशाही अधिकार असतो. परंतु समाजातील अशिक्षितपणा आणि योग्य संस्कृतीचा अभाव यालासुद्धा सध्याची व्यवस्थाच कारणीभूत आहे. पण एवढे नक्की की **उपासमार, बेरोजगारी आणि गरिबीला लोकसंख्या निश्चितच जबाबदार नाही.** हे तथ्ये आणि आकडेवारीसह सिद्ध केले जाऊ शकते.

**बेरोजगारी वाढण्याचे पहिले संरचनात्मक कारण म्हणजे नफेखोर व्यवस्था.** जेथे उत्पादनाचा उद्देश सामान्य जनतेचे कल्याण करणे, त्यांच्या गरजा पूर्ण करणे, कामगारांसाठी कामाच्या मानवी परिस्थितीची हमी देणे नसून नफा वाढवणे हा आहे, तेथे बेरोजगारी नक्कीच वाढणार.

**बेरोजगारी दराचा नवा उच्चांक !**
**10.1%**
**(सीएमआईई, ऑक्टोबर 2023)**

बेरोजगारीने गेल्या 10 वर्षातील सर्व विक्रम मोडीत काढण्याचे कारण म्हणजे अंबानी-अदानी सारख्या लोकांच्या नफेखोरीत घट होऊ नये म्हणून मोदी सरकारने केलेले अर्थव्यवस्थेचे भयंकर गैरव्यवस्थापन. गेल्या 10 वर्षातील खाजगीकरणाच्या वादळामुळे मोठ्या प्रमाणात टाळेबंदी झाली आहे. फक्त सरकारी आकडेवारीबद्दल बोलायचे झाले तर **2016 मध्ये 41.2 कोटी लोकांना नोकऱ्या होत्या, तर 2021 मध्ये फक्त 40.4 कोटी लोकांना नोकऱ्या होत्या.** ते सुद्धा अशावेळी जेव्हा नोकरीची अधिकृत व्याख्याच अशी आहे की जर तुम्ही गेल्या आठवड्यात कोणत्याही एका दिवशी काम केले असेल तर तुम्हाला नोकरी आहे म्हणून गणले जाईल! त्यावर सत्य लोकांसमोर येऊ नये म्हणून मोदी सरकारने नोकरीची आकडेवारी गोळा करणेच बंद केले आहे. वास्तव हे आहे की **ऑक्टोबर 2023 मध्येच बेरोजगारीच्या दराने पुन्हा नवीन विक्रम प्रस्थापित केला आणि 10.1 टक्क्यांच्या वर गेला** (स्रोत: सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी). 2021 पर्यंत युवकांमधील रोजगार दर 10.4 टक्के होता, याचा अर्थ प्रत्येक 100 तरुणांपैकी 90 तरुण बेरोजगार आहेत. **मोदी सरकारच्या गेल्या 10 वर्षांच्या राजवटीत दर मिनिटाला 3 नोकऱ्या गेल्या आहेत, म्हणजे दर तासाला 182 आणि दर दिवसाला 4400 नोकऱ्या.** प्रथम नोटबंदी आणि नंतर कोविड दरम्यान लादण्यात आलेल्या गलथान लॉकडाऊनने विशेषतः कष्टकरी जनतेचे जीवनमान उद्ध्वस्त केले. तरीही बेरोजगारी कमी करण्यासाठी पावले उचलण्याऐवजी मोदी सरकारने रेल्वे, विमानतळ, बँका, विमा संस्था आणि इतर सरकारी उपक्रमांच्या खाजगीकरणाचा सपाटा सुरूच ठेवला आहे. सरकारने श्रम कायदे लागू करणाऱ्या विभागाची यंत्रणा पंगू करून ठेवली आहे आणि कामगार कायदेही रद्द करण्याच्या तयारीत आहे.

**2014-22 मध्ये केंद्र सरकारने दिल्या फक्त**
**7,22,311**
**नोकऱ्या !**

आपल्या देशात आधीपासूनच प्रचलित व विशेषतः मोदी सरकारने सर्वत्र पसरवलेली कंत्राटी पद्धत बेरोजगारीचे मोठे कारण आहे. एक **कंत्राटी, रोजंदारी किंवा अनौपचारिक मजूर साधारणपणे 10 ते 12 तास काम करतो आणि कधी-कधी 14-16 तासही!** भारतातील एकूण कामगारांपैकी 94 टक्के कामगार अनौपचारिक क्षेत्रात आहेत आणि ते तात्पुरते, कंत्राटी किंवा अनौपचारिक कामगार म्हणून काम करतात. जर **60 कोटींहून अधिक कामगारांपैकी**

**94 टक्के 12-12 तास काम करत असतील, तर फक्त त्यांच्यासाठीच कामगार कायदे लागू करण्याचा अर्थ असेल सुमारे 20-25 कोटी नवीन नोकऱ्या. पण मोदी सरकार आणि नारायण मूर्तीसारखे त्यांचे भांडवलदार मित्र जनतेला 12 तास काम करा सांगत आहेत**, कारण म्हणे तेही करतात. आम्ही म्हणतो: तुमचा कारखाना आहे, तुम्ही करा 12 तास काम ! जेव्हा कारखाने, शेते, खाणी आमच्या होतील, तेव्हा गरज पडल्यास करू आमच्या इच्छेने 12 तास काम. आज आम्हाला 8 तासांचा कार्यदिवस द्या, जो कामगार म्हणून आमचा हक्क आहे.

**मोदी सरकारची खाजगीकरण, उदारीकरण, कंत्राटीकरण, अनौपचारिकीकरण आणि भांडवलदारांच्या नफ्यासाठीचे अर्थव्यवस्थेचे गैरव्यवस्थापन ही धोरणे बेरोजगारीला कारणीभूत आहेत. ती भूकंप, पूर, जंगलातील आग किंवा त्सुनामी प्रमाणे नैसर्गिक आपत्ती नाहीत.**

## भ्रष्टाचाराने सर्व मर्यादा का ओलांडल्या आहेत?

जेव्हा सरकारे धनदांडग्यांना जनतेला लुटण्याची खुली परवानगी देतात, तेव्हा त्यांचे नेते आणि मंत्री का मागे राहतील? वाहत्या गंगेत तेही हात धुतात. आणि मोदी सरकारच्या कार्यकाळात तर '**रामाच्या नावानं लूट चाललीय, जमेल तेवढं लुटा**' ही घोषणाच लोकप्रिय झाली आहे. 'चारित्र्याच्या' गोष्टी करणाऱ्या भाजप सरकारने भ्रष्टाचाराचा असा नंगानाच केला आहे की जुने व्यावसायिक भ्रष्टाचारीही मागे पडलेत. **10,000 कोटींचा व्यापम घोटाळा, हजारो कोटींचा राफेल घोटाळा, अदानी घोटाळा, नोटाबंदी घोटाळा, डीमॅट घोटाळा, डीडीसिए घोटाळा, एनपीए घोटाळा, पीएम केअर घोटाळा, ... यादी एवढी लांब आहे** की एक पुस्तक भरता येईल. या घोटाळ्यांमध्ये जे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले तेही जनतेचेच होते. एकीकडे सर्व धनदांडगे आणि भांडवलदारांनी आपली तिजोरी भरली, तर दुसरीकडे सरकारचे मंत्री, नेते, आमदार-खासदार आणि बडे अधिकारी, दलाल यांनीही कमिशनने आपले खिसे भरले. पण या सर्व घोटाळ्यांवर निर्माण झालेला विरोध मोदी सरकारने न्यायव्यवस्था, मीडिया आणि नोकरशाहीला खिशात ठेवून दाबून टाकला. गोदी मीडियाने यात विशेष भूमिका बजावली. गोदी मीडियाबाबत जनतेने असा नियम बनवला पाहिजे की, **जे काही गोदी मीडिया सांगेल त्याच्या उलट जे आहे तेच खरे मानावे.** केवळ एनपीए (नॉन परफॉर्मिंग एसेट) घोटाळ्याद्वारे लोकांच्या कष्टाने कमावलेले **2.67 लाख कोटी रुपये घेऊन सरकारचे घोटाळेबाज मित्र पळून गेले आहेत.** सरकारच्या संगनमताशिवाय हे शक्य आहे का? अजिबात नाही

**2014 पासून भांडवलदारांचे**
**14.56**
**लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ !**

## धर्मवाद, जातीयवाद व अंधराष्ट्रवाद यांची अफू का दिली जात आहे?

वर उल्लेखिलेल्या आपल्या खऱ्या मुद्द्यांचा विचार करण्यापासून रोखण्यासाठी संघ परिवार, भाजप आणि त्यांच्या मांडीवर बसलेला गोदी मीडिया **धर्मवाद, जातीयवाद व अंधराष्ट्रवाद या तीन खोट्या मुद्द्यांमध्ये अडकवतात. कधी मंदिर-मशिद, 'लव्ह जिहाद' तर कधी 'लँड जिहाद', गोरक्षणाचे खोटे नाटक रचून** आमच्या धार्मिक भावनांचा वापर राजकारणासाठी केला जातो, कधी आरक्षणाच्या राजकारणाची आग तापवून मूर्ख बनवायचा प्रयत्न केला जातो, तर कधी चीन किंवा पाकिस्तानची खोटी भीती दाखवून अंधराष्ट्रवादाची लाट पसरवण्याचा प्रयत्न केला जातो. या तिन्ही माध्यमातून लोकांना फसवले जाते. जर चीनकडून भारताला धोका आहे, तर **मोदी सरकारच्या 5 वर्षात चीनमधून भारतातील आयात 30 टक्क्यांनी का वाढली?** भारताची चीनसोबतची व्यापार तूट 1 ट्रिलियन डॉलरच्या वर कशी गेली? तसेच भाजपला गोरक्षणाची एवढी काळजी असेल, तर केरळ, ईशान्य भारतातील, गोव्यातील भाजप नेते गोमांसाचा पुरवठा वाढवण्याचे आश्वासन का देत आहेत? **गोमांस निर्यात करणाऱ्या कत्तलखान्याच्या संचालक मंडळावर भाजपचे संगीत सोम का होते?** मोदी सरकारच्या काळात भारत जगातील चौथा सर्वात मोठा गोमांस निर्यातदार कसा बनला? भाजप जर 'लव्ह जिहाद' बाबत गंभीर असेल तर **संघी गुंडांनी भाजप नेते शाहनवाज हुसेन, मुख्तार अब्बास नक्वी आणि त्याआधी सिकंदर बख्त यांच्या घरांवर हल्ले का केले नाहीत ज्यांनी हिंदू महिलांशी लग्न केले?** मुस्लिम पुरुषाशी लग्न करणाऱ्या भाजप नेते सुब्रमण्यम स्वामी यांच्या मुलीच्या घरावर हल्ला का केला नाही? या प्रश्नांचा तुम्ही कधी विचार केला आहे का??

## समजून घेण्याची बाब...

**हे स्पष्ट आहे की हे सर्व मुद्दे केवळ यामुळेच सध्याचे सरकार आणि संघ परिवाराकडून उचलले जातात की यामुळे आपल्यामध्ये तर्कहीन धर्मवादी विचार आणि भावना निर्माण करून त्यांना राजकीय फायदा होतो आणि वाढत्या महागाई, बेरोजगारी, गरिबी, निरक्षरता आणि उपासमार यापासून आपले लक्ष वळविले जाते.** आपल्यापैकी अनेक निष्पाप लोकही या फसवणुकीला बळी पडतात. पण यापुढील काळात जर कोणी या खोट्या मुद्द्यांचा उल्लेखही तुमच्यासमोर केला तर त्याचे 'आदरातिथ्य' करून त्याला परतीचे दार दाखवा. जर आपल्याला चांगले भविष्य हवे असेल तर आपण शपथ घेतली पाहिजे की आपण केवळ आपल्या जीवनातील ठोस वास्तविक समस्यांबद्दल बोलू. आपण ठरवले पाहिजे की आपण फक्त आपला रोजगार, शिक्षण, वैद्यकीय सेवा, घराचा हक्क, महागाई आणि भ्रष्टाचारापासून स्वातंत्र्याचा हक्क, धर्मवाद आणि जातीयवादापासून मुक्तीचा अधिकार यावरच बोलू. आपण असा निश्चय करुयात की या सर्व मुद्द्यांवर आपण सामान्य कष्टकरी लोक आपल्या स्वत:च्या लढाऊ चळवळी सुरू करू, ज्यांच्या प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे असतील.

## आमच्या प्रमुख मागण्या

- ◊ शिक्षण-रोजगार-आरोग्यसेवा-निवास हे मूलभूत हक्क म्हणून घोषित करा. खाजगीकरणावर बंदी घाला. **भगतसिंह राष्ट्रीय रोजगार हमी कायदा** मंजूर करा, रोजगार देऊ शकत नसल्यास किमान 10,000 रुपये बेरोजगारी भत्ता द्या. केंद्र व राज्य सरकारमधील सर्व रिक्त पदे त्वरित भरा. 'अग्नीवीर' योजना तात्काळ रद्द करा व लष्करात कायमस्वरूपी भरतीची व्यवस्था पूर्ववत करा.
- ◊ सर्व कामगार कायद्यांना काटेकोरपणे लागू करा, प्रस्तावित चार कामगार संहिता रद्द करा. कंत्राटी पद्धत रद्द करा व नियमित स्वरूपाच्या कामात कायमस्वरूपी रोजगाराची व्यवस्था करा. ग्रामीण कामगारांना श्रम कायद्यांअंतर्गत आणा. 'जुनी पेंशन योजना' लागू करा!
- ◊ महागाई रोखण्यासाठी **सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करा;** वाढत्या संपत्तीच्या आधारावर **प्रगतीशील प्रत्यक्ष कर प्रणाली** कठोरपणे अंमलात आणा. पेट्रोल, डिझेल, गॅस वरचे कर रद्द करा.
- ◊ **गरिब आणि मध्यम शेतकऱ्यांसाठी** बियाणे, खते, वीज इत्यादींच्या अनुदानाची योग्य व्यवस्था करा, त्यासाठी श्रीमंत वर्गावर विशेष कर लादावा, सिंचनासाठी सरकारी व्यवस्था आणि **संस्थात्मक कर्जाचीही** योग्य व्यवस्था करावी.
- ◊ **मनरेगा योजनेची** काटेकोर अंमलबजावणी करावी, वर्षभर काम देण्याची तरतूद करावी आणि यासाठी किमान वेतन दिले जावे.
- ◊ "सर्व धर्म समभाव"च्या बनावट धर्मनिरपेक्षतेच्या जागी खरे धर्मनिरपेक्ष राज्य निर्माण करण्यासाठी कायदा आणा. सार्वजनिक जीवनात कोणत्याही नेत्याने किंवा पक्षाने धर्म, समुदाय किंवा श्रद्धेचा उल्लेख व वापर करणे हा दंडनीय गुन्हा घोषित करण्यात यावा.
- ◊ **अस्पृश्यताच नाही तर कोणत्याही स्वरूपातील जातीय भेदभाव हा दंडनीय** गुन्हा म्हणून घोषित करण्यासाठी घटनादुरुस्ती करा.
- ◊ निवडणूकीतील सर्व पक्ष आणि सरकारकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराला आळा बसावा, पब्लिक ऑडिट आणि तपासाची व्यवस्था करा.
- ◊ **महिलांसोबतच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक भेदभावाला समाप्त करा; त्याविरोधात कठोर कायदे करा.**
- ◊ **धार्मिक-जातीय तेढ भडकवणाऱ्या आणि जातीय हिंसाचार व मॉब लिंचिंगमध्ये सक्रिय असलेल्या सर्व प्रकारच्या संघटना आणि पक्षांना दहशतवादी घोषित करा;** त्यांच्या नेत्यांवर आणि कार्यकर्त्यांवर तात्काळ कठोर कारवाई करा.

मित्रांनो! वरील सर्व मागण्या या आपल्या जीवनाशी संबंधित मूलभूत मागण्या आहेत. **या व्यावहारिक मागण्या आहेत. ह्या पूर्ण केल्या जाऊ शकतात.** जगातील काही देशांमध्ये लोकांनी यापैकी बरेच अधिकार मिळवले आहेत, कारण तेथील लोकांनी त्याच्यासाठी लढा दिला. समाजाच्या क्रांतिकारी परिवर्तनाच्या दीर्घ लढाईतील हे एक प्रारंभिक पाऊल आहे. या मागण्यांसाठी कोणताही निवडणूकबाज पक्ष लढणार नाही. याचे कारण असे की काँग्रेस, आप, सपा, बसपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, आरजेडी, जेडीयू, जेडी(एसईसी), सीपीआय(एम), सीपीआय, सीपीआय (एमएल) लिब., बीआरएस, वायएसआर काँग्रेस, अकाली दल असे सर्व निवडणूकबाज पक्ष भांडवलदारांच्याच पैशावर चालतात आणि वेगवेगळ्या प्रकारे त्यांच्यासाठीच धोरणे बनवतात. सध्याच्या काळात देशाच्या भांडवलदारांना फॅसिस्ट भाजपची जास्त गरज आहे, जी उघडपणे आपल्यावर हुकूमशाही पद्धतीने जनविरोधी धोरणे लादू शकते आणि धर्माच्या नावावर आपल्याला आपसात लढवू शकते.

त्यामुळे आज देशातील कष्टकरी जनतेला या मागण्यांसाठी स्वत:चे लढाऊ जनआंदोलन उभारावे लागेल, सध्याच्या जनविरोधी सरकारला धडा शिकवावा लागेल आणि आपल्या लढाऊ चळवळीच्या जोरावर याची हमी बनवावी लागेल की 2024 मध्ये निवडून येणारे कोणतेही सरकार या मागण्यांकडे दुर्लक्ष करू शकणार नाही. **शहीद भगतसिंह म्हणाले होते की, जे सरकार जनतेला त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून वंचित ठेवते अशा सरकारला उलथून टाकणे हा केवळ जनतेचा अधिकारच नाही तर कर्तव्यही आहे. शहीद भगतसिंह यांचा हा संदेश प्रत्यक्षात आणण्याची आज वेळ आली आहे. चला, आपल्या या मोहिमेत, आपल्या या चळवळीत सामील व्हा आणि चांगल्या भविष्यासाठीच्या संघर्षाचा भाग व्हा.**

# ●भारताचा क्रांतिकारी कामगार पक्ष (RWPI)

**●नौजवान भारत सभा ●दिशा विद्यार्थी संघटना ●महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियन ● स्त्री मुक्ती लीग**

BHAGAT SINGH JAN ADHIKAR YATRA
BSJAY

**संपर्क पत्ता:** स्वामी समर्थ मंदिराजवळ, सुपर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे – 38 . फोन 7798364729

दिल्ली: 9289498250, 9693469694; उत्तर प्रदेश: 8858288593, 9891951393; हरियाणा: 8685030984; महाराष्ट्र: 7798364729, 9619039793; बिहार: 8860792320; उत्तराखण्ड: 9971158783; पंजाब: 9888080820; आन्ध्र प्रदेश: 7995828171, 8500208259; तेलंगाना: 9971196111; चण्डीगढ़: 8196803093 @bsjayatra 9582712837